२२ मार्च रोजी जिल्हाभर जागतिक जल दिन साजरा करावा - गुलाब खरात मुकाअ जि प
>> पान 2

हिंद-दी -चादर भव्य सांस्कृतिक कार्यक्रमाचे अकोला व नागपूर येथे आयोजन
>> पान 3

मेहकरमध्ये रमजान ईद उत्साहात; नगराध्यक्ष किशोर गारोळे यांची ईदगाहसह विविध ठिकाणी उपस्थिती
>> पान 4

दैनिक
# आपला विदर्भ


apalavidarbhlivenews@gmail.com
मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 04 ■ अंक 222 ■ रविवार, दि. 22 मार्च 2026 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006

**सुविचार**

दुष्टपणा माणसांना एकत्र आणतो.
– ॲरिस्टॉटल



सारेगमप लिटिल चॅम्प फेम शरयू दातेचं लग्न ठरलं, केनियात केलं प्रपोज

आतील पान

## अशोक खरातचे किती नेत्यांशी ‘लागेबांधे’?

### मोठ्या नेत्यांच्या संबंधामुळे मंत्र्यांचे सीडीआर तपासण्याची मागणी

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** खरातसोबत पाद्यपूजा करतानाचे फोटो समोर आल्यानंतर महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांच्यावर टीकेचा झोड उठली आणि अखेर वाढत्या दबावामुळे त्यांनी शुक्रवारी रात्री उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांना भेटून महिला आयोगाच्या अध्यक्षपदाचा राजीनामा सूपूर्त केला. अशोक खरातबरोबर फोटो असलेल्या राष्ट्रवादीच्या रुपाली चाकणकर या काही एकट्या नेत्या नाहीत. राज्यातील अनेक मोठ्या राजकारण्यांसोबत अशोक खरात याचे संबंध असल्याचे समोर आले. याबाबत गंभीर प्रश्न उपस्थित केले जात आहेत.

नोहेंबर २०२२ मध्ये अशोक खरात हा पहिल्यांदा चर्चेत आला. एकनाथ शिंदे मुख्यमंत्री असताना त्यांनी ज्येष्ठ नेते राधाकृष्ण विखे पाटील आणि दीपक केसरकर यांच्यासह श्री शिवनिका मंदिराला भेट दिली होती. त्यानंतर अनेक राजकीय नेते खरातला भेटू लागले. राज्यात राजकीय अस्थिरता असताना भवितव्य जाणून घेण्यासाठी या भेटी घेतल्या जात असल्याची चर्चा होती.



त्यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरद पवार) अध्यक्ष शरद पवार यांनीही शिंदे यांच्या भेटीवर प्रश्न उपस्थित करत, मुख्यमंत्री पदावर असलेल्या व्यक्तीने असा आदर्श घालणे चुकीचे असल्याचं म्हटलं होतं. त्यांनी शिंदे यांच्या भूमिकेबाबतही शंका व्यक्त केली होती.

दरम्यान, पोलिसांनी खरात याच्याविरुद्ध बलात्कारासह राज्यातील अंधश्रद्धा प्रतिबंधक कायद्यांतर्गत गुन्हा दाखल केला आहे. खरात याच्या मुलाच्या लग्नातील काही फोटो समोर आले असून, त्यात राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे आणि शिवसेनेचे नेते आणि माजी मंत्री दीपक केसरकर उपस्थित असल्याचे दिसत आहे. विशेष म्हणजे, तटकरे यांच्या शेजारी अशोक खरात बसलेले असलेला फोटो आहे. हा फोटो प्रचंड व्हायरल झाल्यामुळे सुनिल तटकरे यांनी याबाबत स्पष्टीकरण दिलं. तटकरे यांनी एक्सवर प्रतिक्रिया देताना म्हटलं, ‘‘सार्वजनिक जीवनात वावरताना प्रत्येकाचाच अनेक व्यक्तींशी तसंच संस्थांशी संपर्क येतो. अनेकदा या संपर्काचे स्वरूप थेट स्वरूपाचे असतेच असे नाही. परंतु याचा अर्थ असा नाही की, एखादे गुन्हेगारी कृत्य करणाऱ्या व्यक्तीला पाठीशी घातले जाईल. उलट या प्रकरणातील पीडितांनी समोर येऊन पोलिसात तक्रार नोंदवावी. आमचे सरकार या प्रकरणात ठाम भूमिका घेऊन दोषींवर कठोरात कठोर कारवाई करेल.’’

याव्यतिरिक्त अजूनही अनेक नेत्यांचे खरात यांच्यासोबत संबंध असल्याचे फोटो समोर येत आहेत. यात भाजपाच्याही काही नेत्यांचा समावेश आहे. हरियाणा आणि राजस्थानमधील काही मंत्री आणि नेते ‘अंकशास्त्र’ आणि ‘भविष्यवाणी’च्या आधारावर आपल्या राजकीय वाटचालीसाठी खरातचा सल्ला घेत असल्याचं बोललं जातं आहे. या संपर्कांमुळेच खरातचे धागेदोरे थेट दिल्लीच्या सत्ताकेंद्रापर्यंत पोहोचले असावेत, अशी शक्यता आता व्यक्त होत आहे.

या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करण्याची मागणी विरोधी पक्षांकडून केली जात आहे. काँग्रेसचे विधिमंडळाचे नेते विजय वडेट्टीवार यांनी याबाबत बोलताना म्हटले, ‘‘लिंगपिसाट खरात याच्या संपर्कात आलेल्या सर्व नवरत्नांचा आणि मंत्र्यांचा तपासला पाहिजे. खरातकडे असलेली अफाट संपत्ती आणि त्याला मंत्र्यांनी दिलेला राजाश्रय पाहता, हे प्रकरण दाबण्याचा प्रयत्न सरकारकडून होत आहे.’’ त्याचबरोबर पोलिसांवर दबाव टाकून मोठे मासे वाचवण्याचे कारस्थान असल्याचा गंभीर आरोप वडेट्टीवार यांनी केला.

खरात प्रकरणात तपासादरम्यान त्यांच्या जवळून जप्त करण्यात आलेल्या पेन ड्राइव्हमध्ये किमान ५८ व्हिडिओ असल्याचं समोर आलं असून, त्यामध्ये इतर पीडित महिला किंवा त्यांच्या नेटवर्कशी संबंधित व्यक्तींचा समावेश आहे का, याची चौकशी पोलीसांकडून सुरू आहे. खरात याला कठोर शिक्षा व्हावी याची राज्यभरातून मागणी केली जात आहे.

दरम्यान अशोक खरात याच्याबरोबरच्या फोटोंसंदर्भात केसरकर यांनी एका व्हिडिओच्या माध्यमातून प्रतिक्रिया दिलेली आहे. त्यामध्ये ते म्हणतात की, भोंदू बाबा अशोक खरातला अटक झालेली आहे. अतिशय घृणास्पद आरोपानंतर ही अटक झाली. या प्रकरणात अशोक खरातला जी काय शिक्षा व्हायची ती होईल, त्याबाबत न्यायालय योग्य तो निर्णय घेईल. मात्र, त्याच्या ओळखीतील लोकांना यामध्ये गुंतवणं, त्यांचे फोटो प्रसिद्ध करणं ही चुकीचं आहे. एक फोटो व्हायरल झाला आहे. त्यामध्ये एकनाथ शिंदे, श्रीकांत शिंदे आणि ते देखील आहेत. तो फोटो इशानेश्वर मंदिराच्या रस्त्याच्या मागणीसाठी अशोक खरात मुंबईत आले होते, तेव्हाचा आहे. तसंच इशानेश्वर मंदिरामुळे माझी आणि अशोक खरातची ओळख झाली ही वस्तुस्थिती आहे. मी स्वत: देव भक्त असल्यामुळे शिर्डीला जात असताना सिन्नरमध्ये हे इशानेश्वर मंदिर असल्यामुळे कधीतरी त्या ठिकाणी जाणं होत होतं, असं दीपक केसरकर यांनी त्यांच्या व्हिडिओमध्ये म्हटलं आहे.

## संक्षिप्त...

### ओडिशात बसला भीषण आग; काँग्रेस आमदारासह ३७ प्रवासी सुखरूप

भुवनेश्वर : ओडिशातील भुवनेश्वर येथे काल रात्री एक मोठी दुर्घटना टळली. एका बसला अचानक आग लागली. ही घटना शुक्रवारी रात्री उशिरा घडली; भुवनेश्वरहून मलकानगिरीच्या दिशेने जाणाऱ्या एका खासगी प्रवासी बसने अचानक पेट घेतला. सर्व प्रवाशांना सुखरूप बाहेर काढण्यात आले. विद्युत शॉर्ट सर्किटमुळे ही आग लागल्याचा प्राथमिक अंदाज आहे. मिळालेल्या माहितीनुसार, बसमधील सर्व प्रवाशांना सुखरूप बाहेर काढल्यानंतरच ही भीषण आग भडकली. ही घटना ओडिशा–आंध्र प्रदेश सीमेजवळील ’रामभद्रपुरम’ परिसरात घडली. मलकानगिरी जिल्ह्यातील चित्रकोंडा मतदारसंघाचे काँग्रेस आमदार मंगू खिल हेदेखील याच बसमधून प्रवास करीत होते. प्राथमिक तपासानुसार, विद्युत शॉर्ट सर्किट हेच या आगीचे संभाव्य कारण असल्याचे मानले जाते. शनिवारी पहाटे ३ वाजण्याच्या सुमारास ही आग लागली. काही क्षणातच संपूर्ण बस आगीच्या भक्ष्यस्थानी पडली. बसमधील सर्व ३७ प्रवाशांना तात्काळ सुरक्षित स्थळी हलवण्यात आले.

सर्व प्रवासी सुखरूप : काँग्रेस आमदार मंगू खिल यांनी सोशल मीडियावर एक पोस्ट शेअर केली. ’’मी भुवनेश्वरमधील बारामुंडा बस स्थानकावरून ’नीलकंठेश्वर’ (केशरी रंगाची बस) नावाच्या प्रवासी बसमधून मलकानगिरीच्या दिशेने प्रवास करत होतो. पहाटे ३ वाजण्याच्या सुमारास आंध्र प्रदेशातील रामभद्रपुरमजवळ असताना बसला आग लागली. बस पूर्णपणे जळून खाक झाली. सुदैवाने सर्व प्रवाशांना बसमधून सुखरूप बाहेर काढण्यात आलंय. त्यानंतर प्रवासाचा पुढील टप्पा पूर्ण करण्यासाठी सर्व प्रवाशांना ’एशियन स्माईल’ नावाच्या दुसऱ्या एका बसमध्ये हलवण्यात आलेत.’’चालकाच्या प्रसंगावधानामुळे जीवित आणि वित्तहानी टळली : चालकाने तात्काळ प्रसंगावधान राखत बस थांबवली आणि आग अधिक पसरण्यापूर्वीच सर्व प्रवाशांना सुरक्षितपणे खाली उतरवले. त्याच्या या तत्पर कृतीमुळे एक मोठी दुर्घटना टळली.

### लॉरेन्स गँगचा भोपाळमध्ये धुमाकूळ : व्यावसायिकाला मागितली १० कोटींची खंडणी, ठार मारण्याची दिली धमकी

भोपाळ : इंदूर शहरात धुमाकूळ घातल्यानंतर लॉरेन्स गँगची दहशत आता राजधानी असलेल्या भोपाळपर्यंत पोहोचली आहे. शहरातील कोलार भागात राहणाऱ्या एका व्यावसायिकानं १० कोटी रुपयांची खंडणी देण्यास नकार दिल्यानं, लॉरेन्स गँगकडून त्याला जीवे मारण्याच्या धमक्या देण्यात आल्या आहेत. या घटनेप्रकरणी पोलिसांनी लॉरेन्स गँगशी संबंधित असलेला कुख्यात गुन्हेगार ’हॅरी बॉक्सर’ याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला असून या प्रकरणाचा तपास सुरू केला आहे. गौरव जैन या व्यावसायिकानं आपल्या जीवाला धोका असल्याचं कारण देत, पोलिसांकडं संरक्षणाची मागणी केली आहे.

लॉरेन्स गँगकडून मारण्याची धमकी : कोलार परिसरात राहणारे व्यावसायिक गौरव जैन हे प्रतिष्ठित समाजसेवकही आहेत. साधारण चार दिवसांपूर्वी त्यांना व्हॉट्स?पवर एक कॉल आला. फोन करणाऱ्या व्यक्तीनं स्वत:ची ओळख लॉरेन्स गँगचा ’हॅरी बॉक्सर’ अशी करून दिली. यावेळी त्यानं १० कोटी रुपयांची खंडणी मागितली. व्यावसायिक जैन यांनी सुरुवातीला या फोनकडं दुर्लक्ष केलं. तीन दिवसांनंतर म्हणजेच २० मार्चच्या सकाळी हॅरी बॉक्सरनं पुन्हा त्याच क्रमांकावरून त्यांच्याशी संपर्क साधून १० कोटी रुपयांच्या खंडणीची पुन्हा मागणी केली.

जेव्हा गौरव जैन यांनी आपण कोणत्याही परिस्थितीत पैसे देणार नाही, असं ठामपणे सांगितलं, तेव्हा फोन करणाऱ्या हॅरी बॉक्सर यानं शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. आता तुझा काटा काढला जाईल, अशी धमकी दिली.

## नाशिकमध्ये भोंदू अशोक खरात कोठडीतच बिथरला; पोलिसी चौकशीत ‘घोर अपराध’ ओरडताच खाक्या दाखवताच शांत

**नाशिक/प्रतिनिधी :** नाशिकमध्ये स्वतःला तंत्रज्योतिषी म्हणवणाऱ्या भोंदू अशोक खरात प्रकरणाने राज्यात मोठी खळबळ उडवली आहे. विविध गंभीर आरोपांमुळे अटकेत असलेल्या खरातची पोलिस कोठडीत चौकशी सुरू असताना पहिल्याच दिवशी नाट्यमय घडामोडी घडल्याची माहिती समोर आली आहे.

माहितीनुसार, अटकेनंतर पहिल्या दिवशी खरात पूर्णपणे शांत होता. पोलिसांच्या चौकशीदरम्यान त्याने एकाही प्रश्नाला उत्तर दिले नाही आणि मौन बाळगले. पीडितेकडून करण्यात आलेल्या आरोपांबाबत विचारणा करूनही तो काही बोलला नाही. मात्र, पोलिसांनी कडक पद्धतीने उलटतपासणी सुरू केल्यानंतर परिस्थिती अचानक बदलली. खरात संतापून मोठ्याने ओरडू लागला. घोर अपराध, घोर अपराध असे तो वारंवार ओरडत होता. त्याचा आक्रमक पवित्रा पाहून काही काळ पोलीस कर्मचारीही सावध झाले. मात्र पोलिसांनी कठोर भूमिका घेतल्यानंतर काही वेळातच तो पुन्हा शांत झाला.

दरम्यान, या प्रकरणाची व्याप्ती लक्षात घेता राज्य सरकारने विशेष तपास पथक स्थापन केले आहे. SIT मार्फत चौकशी सुरू असून गुरुवारी दोन तास खरातची सखोल चौकशी करण्यात आली. तपासादरम्यान पोलिसांच्या हाती एक पेनड्राइव्ह लागला असून त्यामध्ये अनेक आक्षेपार्ह व्हिडिओ असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे.

याशिवाय, गुन्हे शाखेच्या पथकाने सिन्नर तालुक्यातील मिरगाव येथील खरातच्या फार्महाऊसवर छापा टाकला. या कारवाईत एक पिस्तूल, जिवंत काडतुसे तसेच काही महत्त्वाचे दस्तऐवज जप्त करण्यात आले आहेत. तपासात खरातने अल्पावधीत मोठ्या प्रमाणात संपत्ती जमा केल्याचा संशय व्यक्त होत आहे. शिर्डी परिसरात त्याच्या कुटुंबीयांच्या नावे मालमत्ता असल्याचीही माहिती समोर येत आहे. अघोरी उपाय आणि दैवी शक्तीच्या नावाखाली महिलांचे शोषण केल्याचे गंभीर आरोप त्याच्यावर आहेत. या प्रकरणातील धक्कादायक बाबी पुढील SIT चौकशीत उघड होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

## मायलेकीवर काळाचा घाला: धुणं धुण्यासाठी गेलेल्या मायलेकी खदानीत बुडाल्यानं खळबळ

**जालना/प्रतिनिधी :** धुणं धुण्यासाठी गेलेल्या मायलेकींचा खदानीतील पाण्यात बुडून दुर्दैवी मृत्यू झाल्यानं मोठी खळबळ उडाली आहे. ही घटना भोकरदन तालुक्यातील पंढरपूर वाडी इथं शुक्रवारी घडली. कावेरी दशरथ मोहिते ( वय अंदाजे २८ वर्ष ) आणि सोनाली दशरथ मोहिते ( वय १३ वर्ष ) अशी खदानीत बुडून दुर्दैवी मृत्यू झालेल्या मायलेकींची नावं आहेत. या घटनेमुळे संपूर्ण गावात शोककळा पसरली आहे.

खदानीत बुडून मायलेकींचा मृत्यू : मिळालेल्या माहितीनुसार, कावेरी दशरथ मोहिते ( वय अंदाजे २८ वर्ष ) या आपल्या मुलगी सोनाली दशरथ मोहिते हिच्यासह गावाजवळील खदानीवर धुणं धुण्यासाठी गेल्या होत्या. दरम्यान, कपडे धुत असताना अचानक कावेरी मोहिते यांचा पाय घसरून त्या पाण्यात पडल्या. आई पाण्यात बुडताना पाहताच मुलगी सोनाली हिनं तिला वाचवण्यासाठी प्रयत्न केला. मात्र पाण्याची खोली जास्त असल्यानं आणि परिस्थिती गंभीर झाल्यानं दोघींनाही बाहेर येता आलं नाही. काही वेळ लोटल्यानंतर मायलेकी परत न आल्यानं कावेरी मोहिते यांचे पती दशरथ मोहिते यांनी शोध घेतला.

पतीवर कोसळला दु:खाचा डोंगर : दशरथ मोहिते यांनी पत्नी आणि मुलीचा शोध घेतला असता, त्यांना खदानीजवळ कपडे आढळून आले. यावेळी त्यांना दोघी मायलेकी खदानीतील पाण्यात बुडाल्याचं आढळून आलं. त्यामुळे ही माहिती तत्काळ पोलिसांना देण्यात आली. घटनेची माहिती मिळताच हसनाबाद पोलीस ठाण्याचे पोलीस अधिकारी कर्मचारी यांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला. दोघी मायलेकींना भोकरदन येथील शासकीय ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आलं. मात्र तेथील वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासून दोघींनाही मृत घोषित केलं. सायंकाळी सुमारे ६ वाजता पंढरपूर वाडी इथं त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. या घटनेमुळे गावात सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे. विशेष म्हणजे सोनाली ही इयत्ता सातवीत शिकत होती. साध्या स्वभावाच्या कावेरी मोहिते आणि आईला वाचवण्यासाठी जीवाची बाजी लावणारी लहानगी सोनाली यांच्या मृत्यूनं दशरथ मोहिते यांच्यासह गावकऱ्यांना मोठा धक्का बसला आहे.

## केरळ विधानसभा निवडणुकीसाठी भाजपची तिसरी यादी जाहीर

नवी दिल्ली : भाजपने २०२६ च्या केरळ विधानसभा निवडणुकीसाठी आपल्या उमेदवारांची तिसरी यादी जाहीर केली आहे. या यादीत ११ उमेदवारांच्या नावांचा समावेश आहे. केंद्रीय निवडणूक समितीने या नावांना अंतिम मंजुरी दिली आहे. या यादीनुसार, पेरुमाडे मतदारसंघासाठी व्ही. रतीश आणि पुथुप्पल्लीसाठी रवींद्रनाथ वक्कट्थानम यांना उमेदवारी देण्यात आली आहे.

भाजपने आपल्या तिसऱ्या यादीत प्रामुख्याने दक्षिणेकडील जिल्ह्यांवर लक्ष केंद्रित केले आहे. पक्षाने तिरुवनंतपुरम, कोवलम, पुथुपल्ली आणि चावरा यांसारख्या जागांवर उमेदवार उभे केले आहेत. पक्षाने अनुसूचित जाती (एण) जागांसाठीही उमेदवारांची घोषणा केली असून, यातून सामाजिक संतुलन राखण्याचे पक्षाचे प्रयत्न स्पष्टपणे दिसून येतात. या यादीत पेरुमाडे येथून व्ही. रतीश, पुथुपल्ली येथून रवींद्रनाथ वकथानम, चावरा येथून के. आर. राजेश आणि चडयमंगलम येथून आर. एस. अरुण राज यांचा समावेश आहे. तसेच तिरुवनंतपुरम येथून करमना जयन, अरुविक्कारा येथून विवेक गोपन, कोवलम येथून टी. एन. सुरेश आणि नेय्याट्टिनकारा येथून एस. राजशेखरन नायर यांचाही समावेश आहे.




## नवोदयच्या प्रवेश परिक्षेत सुजाता सरकटे मागासवर्गीय मुलीमधून जिल्ह्यात प्रथम

### झोडगा येथील जिल्हा परिषद शाळेचे गौरवशाली यश : शिक्षक व विद्यार्थीवर कौतुकाचा वर्षाव

दैनिक आपला विदर्भ

**वाशीम /प्रतिनिधी :** मालेगाव तालुक्यातील झोडगा खुर्द येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील विद्यार्थीनी सुजाता भिमराव सरकटे हिने शिक्षक विकास वाझुळकर यांच्या मार्गदर्शनात नवोदयच्या प्रवेश परिक्षेमध्ये ९७.५० गुण मिळवून मागासवर्गीय मुलीमधून जिल्ह्यात प्रथम पटकावित गौरवशाली यश संपादन केले आहे.

या यशाबद्दल शिक्षक व गुणवंत विद्यार्थीचे सर्वत्र कौतुक होत आहे. अतिशय कठीण समजल्या जाणाया स्पर्धात्मक परिक्षेत झोडगा येथील जिल्हा परिषद शाळेच्या सुजाता सरकटे हिने अतिशय जिल्ह्यातून एकूण विद्यार्थ्यांमधून १२ वा क्रमांक मिळविला. तर, मागासवर्गीय मुलींमधून प्रथम क्रमांक मिळवून शाळेचे तसेच गावाचे नाव शिक्षण पटलावर आणले आहे.

जिद्द, मेहनत, चिकाटी आणि अभ्यासातील सातत्यामुळे तिने हे यश संपादन केले. जिल्हा परिषदेचे शिक्षणाधिकारी ससाणे,जिल्हा परिषद उपशिक्षणाधिकारी डाबेराव यांनी शाळा भेटी दरम्यान नवोदय परीक्षेची तयारी करणाया सर्व मुलांचे कौतुक करून त्यांना मार्गदर्शन केले. तसेच मालेगाव पंचायत समितीचे गट शिक्षणाधिकारी परांडे,अमानीचे केंद्र प्रमुख बोरकर यांच्या सतत होणाया भेटीमधून सर्व विद्यार्थ्यांना प्रेरणा व मार्गदर्शन मिळाले. तसेच झोडगा खु. येथील जि.प. प्रा. शाळेचे माजी मुख्याध्यापिका रंजना उबाळे, मुख्याध्यापक डिगांबर बोरकर, शाळेतील शिक्षक विकास वाझुळकर, रामदास मुठाळ यांचे मोलाचे मार्गदर्शन या विद्यार्थ्यांना लाभले आहे.

नवोदय विद्यालयाच्या प्रवेश परिक्षेत यश सुजाताने मिळविलेल्या यशाबद्दल संपूर्ण गावकयांनी एकत्र येऊन तिचा येथोचित सत्कार करुन तिचे कौतुक केले. याप्रसंगी गावातील काशिराम मुठाळ, श्रीराम सुरुशे, किसन मुठाळ, नारायण सरकटे,



रामकिसन वाघ, सुधाकर सरकटे, विजय सरकटे, अक्षय सरकटे, विशाल सरकटे, राहुल मुठाळ, श्रीराम सरकटे, मदन सुरुशे, विवेक सरकटे, सुदर्शन धुळधुळे, भिमराव सरकटे, गजानन सुरुशे, राजु सरकटे, गोविंदा सरकटे, वैभव सरकटे, आकाश सरकटे, राहुल सरकटे, भाऊराव सुरुशे, देवानंद मोरे, दिनेश मोरे, सम्यक सरकटे, गौतम सरकटे मधुकर सरकटे,अतुल सरकटे, संजय वाघ रामदास मुठाळ, अश्विन सुरुशे, ज्ञानेश्वर तुर्के , महेश मुठाळ आदींसह गावातील महिलांची सुद्धा मोठ्या संख्येने उपस्थिती होती. सुजाताच्या या यशामुळे झोडगा खुर्द गावासह संपूर्ण परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून सर्व स्तरातून तिच्यावर व तिला मार्गदर्शन करणारे शिक्षक विकास वाझुळकर यांच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे.

## संकटाची चाहूल..

निसर्गाचे बदलते चक्र किंवा लहरी हवामानाचा मुद्दा अलीकडच्या काही वर्षांत ऐरणीवर आला आहे. मागच्या पाच ते सहा दिवसांपासून महाराष्ट्राच्या काही भागांत होणारा अवकाळी पाऊस व गारपीट, हा त्याचाच नमुना म्हणावा लागेल. नेमेची येतो पावसाळा, असे म्हणतात. त्याला जोडूनच आता नेमेची येतो अवकाळी पाऊस असे म्हणण्यासारखी स्थिती निर्माण व्हावी, यातच सगळे आले. अनेक जिल्ह्यांमध्ये रब्बीचे पीक मोठ्या प्रमाणात घेतले जाते. परंतु, अवकाळी व गारपीटीने या पिकावर सध्या गंडांतर आलेले पहायला मिळते. यंदाच्या गारपिटीचा ११ जिल्ह्यांना फटका बसल्याचे सांगण्यात येते. यामध्ये अहिल्यानगर, नागपूर, चंद्रपूर, लातूर, नांदेड, धाराशिव, यवतमाळ, सोलापूर, पुणे, सातारा, कोल्हापूर यांसारख्या जिल्ह्यांचा समावेश आहे. गहू आणि हरभरा या पिकांची बहुतेक ठिकाणी काढणीची कामे सुरू असताना पावसाने शेतकऱ्यांच्या तोंडातील घास हिरावून घेतला आहे. कांदा, मका, ज्वारी, आंबा, केळी, कलिंगड, खरबूज, ऊस, पपई, द्राक्षे, डाळिंब, लिंबू, मोसंबी, संत्रे तसेच भाजीपाला पीकाची यामध्ये मोठी वाताहत झाल्याचे आकडेवारीतून ध्यानात येते. यात सर्वाधिक नुकसान अहिल्यानगर जिल्ह्यात झाले आहे. या जिल्ह्यातील ३ हजार ५५८ हेक्टर पिकांना फटका बसला आहे. आत्तापर्यंत एकूण ३० तालुक्यांतील ६ हजार ९१३ हेक्टरवरील पिके जमीनदोस्त झाली आहेत. अवकाळीचा तडाखा सुरुच असल्याने हा आकडा आणखी वाढू शकतो. हवामानातील चढ–उतार आपल्याला नवे नाहीत. परंतु, त्याची वाढती तीव्रता निश्चितच शेतकऱ्यांसाठी चिंताजनक ठरते. गारपीट पूर्वीही व्हायची. पण, त्याचे प्रमाण इतके नव्हते. त्यामुळे गारांचा हा पाऊस आल्हाददायक वाटायचा आणि त्याच्याकडे आनंदाचे प्रतीक म्हणूनही पाहिले जायचे. आता गारपीट म्हणजे संकट म्हणूनच ओळखले जाते. याला कारण गारपीटीचे सातत्याने दिसणारे उपद्रवमूल्य होय. मध्य प्रदेश, पूर्व उत्तर प्रदेश, पूर्व राजस्थान, आसाम व अऊणाचल प्रदेशवर हवेची द्रोणीय स्थिती, मध्य प्रदेश–विदर्भ–मराठवाडा तसेच उत्तर कर्नाटकदरम्यान असलेला हवेचा दाब यामुळे देशाच्या अनेक भागात अवकाळी पावसासह गारपीट होत आहे. महाराष्ट्राशिवाय हिमाचल प्रदेश, मध्य प्रदेश, छत्तीसगड, तेलंगणा, कर्नाटक राज्यातदेखील अनेक भागात गारपीट झाल्याचे वृत्त आहे. याशिवाय उत्तरेतील काही राज्यांना गारपिटीचा इशाराही देण्यात आला आहे. हे बघता गारपीटीचा धोका कमी अधिक प्रमाणात देशातील बहुतांश राज्यांना भेडसावताना दिसतो. त्यामुळे या संकटाचा सामना कसा करायचा, त्यातून मार्ग कसा काढायचा, पिकांचे संरक्षण कसे करायचे, याचा दीर्घकालीन विचार करणे क्रमप्राप्त ठरते. वास्तविक सध्याचे दिवस कडक उन्हाळ्याचे आहेत. वाड्यावस्त्यांपासून शहरातील सोसायट्यांपर्यंत सर्वत्र पाणीटंचाईची झळ बसताना दिसत आहे. त्यात कडक उन्हाळ्यानेही हैराण करुन सोडले आहे. अशा काळात गारपीट व अवकाळी पाऊस हा दिलासा वाटावा. पण तात्पुरताच. कारण बदलत्या चक्रामुळे निसर्गाची म्हणून जी साखळी असते, त्यात अनेक अडथळे निर्माण होतात. सध्या अशीच परिस्थिती आहे. तसा मागच्या वर्षी देशभर सर्वत्र दमदार पाऊस झाला. थंडीची तीव्रताही अधिक असल्याचे दिसून आले. त्यानंतर गारपीट व अवकाळीसारखी संकटेही तितकीच तीव्र असल्याचे पहायला मिळत आहे. गतवर्षी मेमध्येच पाऊस सुरु झाला होता, या वर्षी काय होते, हे पहावे लागेल. दुसऱ्या बाजूला प्रशांत महासागरातील ला निनो या थंड पाण्याचा प्रवाहाचा परिणाम आता कमी होत आहे. त्यामुळे जुलैनंतर एल निनो वाढीस लागण्याचा अंदाज जागतिक हवामान संस्थेने वर्तविला आहे. परिणामी मान्सूनच्या दुसऱ्या टप्प्यावर परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. २०२३–२०२४ साली प्रशांत महासागरात एल निनो उद्भवला होता. यामुळे २०२४ साल हे तापदायक वर्षांमध्ये गणले गेले होते. एल निनोमुळे भारतीय मान्सूनवर परिणाम होऊन तो कमी बरसल्याचे आकडेवारीवरून स्पष्ट होते. त्यामुळे यंदा एल निनोचा अंदाज वर्तविल्यानंतर भीतीचे सावट पसरल्याचे दिसून येते. गेल्या वषी प्रशांत महासागरात ला निनोची स्थिती होती. ला निनो अर्थात प्रशांत महासागरात निर्माण होणाऱ्या थंड पाण्याच्या प्रवाहांमुळे भारतीय मान्सूनवर विपरीत परिणाम होत नाही. त्यामुळे २०२५ साली पावसाचे भरभरून दान मिळाले. सध्या ला निनोचा कालावधी संपत आला असून, एप्रिलपर्यंत प्रशांत महासागरात तटस्थ स्थिती निर्माण होणार आहे. एल निनोची स्थिती भारतीय भूभागावर येणारे बाष्पयुक्त वारे खेचून घेत असल्याने पाऊस कमी बरसतो. याशिवाय यामुळे प्रशांत महासागराच्या समुद्रसपाटीचे तापमान वाढते. तसेच वाऱ्यांचा वेग, पॅटर्न, दाब, पावसाची स्थिती बदलते. मार्च ते मेच्या कालावधीत प्रशांत महासागरातील एन्सोची स्थिती तटस्थ (म्हणजेच ना एल निनो किंवा ना ला निनो राहणार) अशी राहण्याची शक्यता ६०, तर एप्रिल ते जूनच्या कालावधीत ती ७० टक्के राहण्याचा अंदाज आहे. तसेच जुलैनंतर एल निनो उद्भवण्याची शक्यता ही ४० टक्के इतकी आहे. एकूणच जुलैनंतर तो वाढीस लागणार आहे. म्हणजे वर्षाच्या दुसऱ्या तसेच मान्सून दुसऱ्या टप्प्यापासून तो अधिक कार्यशील राहणार असल्याची चिन्हे आहेत. मान्सूनचा दुसरा टप्पा अर्थात ऑगस्ट आणि सप्टेंबर या कालावधीत सर्वाधिक व सरासरीच्या अधिक पाऊस बरसत असतो. त्यामुळे या कालावधीतील पाऊस हा शेतीबरोबरच पिण्याच्या पाण्याकरिताही महत्त्वाचा मानला जातो. पण, एल निनोचा फटका मान्सूनला बसला, तर अवर्षणाची वा दुष्काळाची स्थिती निर्माण होऊ शकते. ही धोक्याची घंटाच ठरावी. भारतीय शेती तसेच अर्थव्यवस्था पूर्णपणे मान्सूनवर अवलंबून आहे. आधीच जागतिक युद्ध, इंधन, गॅसची टंचाई, वाढती महागाई यामुळे सामान्य माणूस मेटाकुटीस आला आहे. अशा स्थितीत एल निनोच्या संभाव्य संकटामुळे काळजाचा ठोका चुकला नाही, तर नवलच. देशात पावसाळा, हिवाळा आणि उन्हाळा हे ऋतू आहेत. या तीन ऋतूंमध्ये असमतोल निर्माण झाला, की संकट येते. हे घोंघावणारे वारे पाहता आपल्याला संकटपूर्व नियोजन करावेच लागेल.

# २२ मार्च रोजी जिल्हाभर जागतिक जल दिन साजरा करावा - गुलाब खरात मुकाअ जि प

**बुलढाणा/प्रतिनिधी :** २२ मार्च रोजी जागतिक जल दिन सर्वत्र साजरा करण्यात येतो. यामध्ये पाण्याविषयी जाणीव जागृती करण्यात येते. जलपूजन, जल प्रतिज्ञा घेऊन पाण्याबाबत कृतज्ञता व्यक्त केली जाते. याचाच एक भाग म्हणून बुलढाणा जिल्ह्यातही सर्व ग्रामपंचायत, सर्व पंचायत समिती यांनी आपल्या स्तरावर जलदिन साजरा करण्याचे निर्देश मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद बुलढाणा गुलाब खरात यांनी दिले आहेत.

दिनांक २२ मार्च रोजी जगभर जागतिक जलदिन साजरा केला जातो. या दिवशी जल शपथ घेऊन, जलपूजन करून पाण्याबाबत कृतज्ञता व्यक्त केली जाते. दिनांक ८ मार्च ते २२ मार्च दरम्यान जल महोत्सव २०२६ देशभर मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येत आहे. त्याची सांगता जागतिक जलदिनाने म्हणजेच २२ मार्च रोजी होणार आहे. यामध्ये विविध उपक्रम बुलढाणा जिल्ह्यातही राबविण्यात आले आहेत. यामध्ये जल अर्पण दिवस साजरा करण्यात आले आहेत. ११ मार्च रोजी जागतिक प्लंबर दिनानिमित्त प्लंबर यांचा सत्कार करण्यात आला आहे. द्वारे पाणी तपासण्याचे प्रात्यक्षिक गावागावात दाखवण्यात आले आहे आणि २२ मार्च रोजी या अभियानाची सांगता होत असून त्या दिवशी मोठ्या प्रमाणावर सर्वच ग्रामपंचायतीमध्ये, सर्वच पंचायत समिती स्तरावर जागतिक जलदिन साजरा करण्याचे निर्देश मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद बुलढाणा गुलाब खरात यांनी दिले आहेत. यामध्ये जल पूजन, जल प्रतिज्ञा घ्यायची आहे.

या कार्यक्रमाला संबंधित गावातील सर्व गावकरी, महिला, युवक यांना आमंत्रित करायचे आहे. आणि पाण्याबाबत कृतज्ञता व्यक्त करायची आहे. असे निर्देश मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाब खरात यांनी दिले आहेत. या उपक्रमाचे सूक्ष्म नियोजन सतीश देशमुख प्रकल्प संचालक जल जीवन मिशन, जिल्हा परिषद बुलढाणा, अनिल चव्हाण कार्यकारी अभियंता ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद बुलढाणा यांच्या नियंत्रणाखाली करण्यात आले आहे.

> जागतिक जल दिनानिमित्त जे उपक्रम राबवायचे आहेत जसे की जलपूजन, जल प्रतिज्ञा या सर्व उपक्रमाचे फोटो संबंधित ग्रामपंचायत यांनी त्यांच्या च्या अकाउंट वरून जल महोत्सव या टॅब त्याअंतर्गत ऑनलाइन करायचे आहेत. याची सर्व ग्रामपंचायत अधिकारी यांनी नोंद घेऊन सदर उपक्रम प्रभावीपणे राबवावा
>
> **– सतीश देशमुख प्रकल्प**
> **संचालक जल जीवन मिशन, जिल्हा परिषद बुलढाणा**

## तत्कालिन उपराष्ट्रपती जगदीप धनखडांचा तडकाफडकी राजीनामा का घेतला? संजय राऊतांच्या पुस्तकातून सनसनाटी गौप्यस्फोट

**मुंबई/प्रतिनिधी :** शिवसेना खासदार संजय राऊत यांना कथित पत्राचाळ प्रकरणामध्ये ईडीकडून अटकेची कारवाई करण्यात आल्यानंतर १०० आर्थर रोडमधील जेलमध्ये घालवली. यावेळी त्यांनी 'नरकातील स्वर्ग' पुस्तक लिहिलं होतं. आता या पुस्तकाची हिंदी आणि इंग्रजी आवृत्ती सुद्धा येत असून सोमवारी (२३ मार्च) या पुस्तकाचे प्रकाशन होत आहे. या नव्या पुस्तकांमध्ये चार प्रकरणे नव्याने जोडण्यात आली आहेत. यामध्ये माजी उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांचा तडकाफडकी राजीनामा का घेण्यात आला? याबाबत खुलासा करण्यात आला आहे.



जगदीप धनकड यांना सुद्धा ईडीचा धाक दाखवून राजीनामा घेण्यात आल्याचा धक्कादायक खुलासा या पुस्तकामधून करण्यात आला आहे. इतकेच नव्हे तर माजी निवडणूक आयुक्त अशोक लवासा यांच्या कुटुंबाला सुद्धा ईडीचा धाक दाखवण्यात आल्याचा दावा या पुस्तकातून करण्यात आला आहे. संजय राऊत यांनी इंग्रजी पुस्तकांमध्ये नव्याने चार प्रकरणे जोडले असून यामध्ये म्हटले आहे की जगदीप धनखड यांच्या निवासस्थानी मोदी सरकार विरोधात कारवायांची माहिती मिळाली होती. याचा सुगावा लागताच सरकारकडून त्यांचा राजीनामा मागण्यात आला. मात्र, जगदीप धनखड यांनी राजीनामा देण्यास नकार दिला होता. त्यामुळे सरकारकडून जयपूरमध्ये त्यांनी घराचा व्यवहार केल्यानंतर त्यातील पैसा हा परदेशात पाठवला होता. याच प्रकरणावरून ईडीने फाईल तयार केली आणि हीच फाईल जगदीश धनखड यांच्यासमोर ठेवण्यात आली, असेही म्हटलं आहे.

विशेष म्हणजे संजय राऊत यांनी काही दिवसांपूर्वीच जगदीश धनखड यांची भेट घेतली होती. त्यावेळी त्यांचे पहिल्यांदाच राजीनाम्यानंतर थेट दर्शन झाले होते.

दरम्यान, या पुस्तकाचा प्रकाशन सोहळा सोमवारी होणार असून या पुस्तक प्रकाशन सोहळ्यासाठी लोकसभेतील विरोधी पक्ष नेते राहुल गांधी उपस्थित राहणार होते, तसेच शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे सुद्धा उपस्थित राहणार होते. मात्र दे दोन्ही नेते उपस्थित राहणार आहेत.

## चारित्र्यनिर्मिती हाच भक्कम नेतृत्वाचा पाया – उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन

**नागपूर/प्रतिनिधी :** भारतीय युवा संसद परिषद हे केवळ चर्चेचे व्यासपीठ नसून ते भविष्यातील जबाबदार नागरिक घडविण्याचे प्रभावी माध्यम आहे. या परिषदेच्या माध्यमातून तुमच्या विचारांना आकार दिला जातो. चारित्र्याची जडणघडण होते. चारित्र्यनिर्मिती हाच भक्कम नेतृत्वाचा पाया आहे. जर आपले आयुष्य चारित्र्य संपन्न असेल, तर आपले नेतृत्व प्रभावी ठरेल, असे प्रतिपादन उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन यांनी आज येथे केले.



रेशीमबाग येथील महर्षी व्यास सभागृहात २९ व्या भारतीय युवा संसद परिषदेचे उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन आणि महाराष्ट्राचे राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. यावेळी ते बोलत होते. महसूल मंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सह सरकार्यवाह डॉ. कृष्ण गोपाल, केंद्रीय संस्कृत विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. श्रीनिवास वरखेडी, भारतीय युवा संसद परिषदेचे राष्ट्रीय संयोजक आशुतोष जोशी व्यासपीठावर उपस्थित होते.

उपराष्ट्रपती म्हणाले की, कोणत्याही देशाची क्षमता आणि सामर्थ्य हे त्या देशाच्या तरुण लोकसंख्येच्या आकारावर आणि ताकदीवर अवलंबून असते. भारताकडे तरुणांची मोठी संख्या ही जमेची बाजू आहे. आज देशातील सुमारे ६५ टक्के लोकसंख्या ३५ वर्षाखालील आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या दूरदृष्टीपूर्ण नेतृत्वाखाली केंद्र सरकारने तरुणांच्या शिक्षण, कौशल्य आणि नेतृत्व विकासासाठी अनेक उपक्रम सुरू केले असल्याचे ते यावेळी म्हणाले.

# कोरेगावात भाजपसोबत निवडणूकपूर्व युती, कामेश कांबळे देवेंद्र फडणवीसांना भेटले, पालकमंत्र्यांनी सायरन का वाजवला?

## महेश शिंदेंचा सवाल, शशिकांत शिंदेंवर टीकेची झोड

सातारा : कोरेगावचे शिवसेनेचे आमदार महेश शिंदे यांनी आज पत्रकार परिषद घेत त्यांची भूमिका स्पष्ट केली आहे. महेश शिंदे म्हणाले की जिल्हा परिषद निवडणुकीच्या आधी महायुतीच्या झालेल्या बैठकीमध्ये युतीच्या बाबत ज्या त्या आमदाराने त्याला योग्य वाटेल त्या पद्धतीने त्यांच्या मतदारसंघात निर्णय घ्यावा असा निर्णय झाला होता. मी माझ्या मतदारसंघांमध्ये युतीमधील दोन्ही पक्षांशी चर्चा केली परंतु एका पक्षाने (राष्ट्रवादीने) स्पष्ट नकार दिला होता. त्यानंतर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याशी झालेल्या बैठकीत माझ्या मतदारसंघातील एकूण सात पैकी ४ जागा शिवसेना आणि ३ जागा भाजप लढवणार असं ठरलं होतं. प्रीपोल अलायन्स भाजपसोबत असल्यानं त्यांच्याबरोबर राहणं हे आमचं कर्तव्यच होतं, असं महेश शिंदे म्हणाले.

भाजपसोबत प्रीपोल अलायन्स : महेश शिंदे

महाविकास आघाडीतील राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटाचे नेते प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे हे साताऱ्यातील शिवसेना आणि राष्ट्रवादी अजित पवार गट यांच्या युतीत असल्याचे कळल्यावर आम्हाला त्यांच्यासोबत जाण उचित वाटलं नाही. केंद्रात जे लोक आपल्या विरोधात आहेत त्यांच्यासोबत काम करणं योग्य वाटल नाही. माझ्या मतदारसंघातील शिवसेनेचे दोन्ही सदस्य राष्ट्रवादीच्या विरोधात लढून जिंकून आले आहेत. त्यामुळे त्यांनी प्रीपोल अलायन्स यांच्याबरोबर होते, त्या भाजप बरोबर राहण्याचा निर्णय घेतला.तो निर्णय अगदी योग्य होता.

पालकमंत्री शंभूराज देसाई यांच्यासोबत प्रीपोल अलायन्सबाबत चर्चा झालेली होती. राज्याची एकनाथ शिंदे गटाने वेगळं व्हायची भूमिका घेतली होती त्यावेळी जी परिस्थिती होती तीच परिस्थिती साताऱ्यात आज झाली. प्रीपोल अलायन्स बरोबर राहण्याचा आम्ही निर्णय घेतला कारण भाजप बरोबरच प्री पोल अलायन्स करून राहण्याचा निर्णय घेतला. शशिकांत शिंदे हे माझे बांधावरचे दुश्मन नाहीत.पण ते आमचे राजकीय विरोधक आहेत त्यामुळे आम्ही त्यांच्या सोबत कोणत्या तोंडाने जाऊ शकतो, असं महेश शिंदे म्हणाले.

शशिकांत शिंदे हे त्यांची तुतारी विसरून घड्याळाकडे गेले आहेत याबाबत आम्हाला आश्चर्य वाटत आहे. त्यांनी एकदा भूमिका जाहीर केली पाहिजे. नरेंद्र मोदी आणि अमित शहा हे आमचे राष्ट्रीय नेते आहेत ही भूमिका त्यांनी आता जाहीर केली पाहिजे. साताऱ्यात येऊन आमच्या नेत्यांची, केंद्रातल्या नेत्यांची माप काढली जातात त्या नेत्यांबरोबर अलायन्स करणं योग्य की अयोग्य हा विचार सर्वांनी केला पाहिजे. जिल्ह्यात पोलीस प्रशासन हे पालकमंत्र्यांच्या नेतृत्वाखाली काम करत असत.मला नाही वाटत की पोलीस प्रशासनाकडून कोणत्या चुकीच्या गोष्टी घडल्या असतील, असं महेश शिंदे म्हणाले.

अपहरणाचा दाखल झालेला गुन्हा हा भारतीय जनता पार्टीने केलेला नसून त्यांच्या कुटुंबातल्या मुलाने दाखल केलेला आहे. पोलीस प्रशासनामध्ये मला वाटत नाही पालकमंत्र्यांच्या एवढं कुणाचं चालत असेल. पालकमंत्र्यांची लोक त्यांच्याबरोबर राहिली नाहीत.पालकमंत्र्यांचा प्रीपोल अलायन्स राष्ट्रवादीबरोबर होता म्हणून ते त्यांच्यासोबत गेले आमचा प्रीपोल अलायन्स भाजप बरोबर होता म्हणून आम्ही भाजपबरोबर राहिलो. सभागृहामध्ये शंभूराज देसाई यांच्या शिवसेनेचं संख्याबळ त्यांच्याबरोबर राहिले परंतु राष्ट्रवादीचे संख्याबळ राहू शकले नाही याची चिडचिड पोलिसांबरोबर करणे चालत नाही. ज्याने त्याने आपले निवडून आलेले सदस्य सांभाळायचे असतात, असं महेश शिंदे म्हणाले. पालकमंत्री आणि त्यांच्या सोबत असलेल्या लोकांनी स्वत:चे सदस्य तुरुंगातून आणल्यासारखे जिल्हा परिषदेमध्ये आणले. दीड दीड महिना या सदस्यांना कोंडून ठेवून सुद्धा हे सदस्य तुमच्याकडे टिकले नाहीत. राष्ट्रवादीचे पाच जण भाजप बरोबर येण्यासाठी तयार होते, त्यांना नरेंद्र मोदी आणि अमित शहा यांचे नेतृत्व आवडत असल्यामुळे ते आमच्या सोबत यायला तयार होते.

कामेश कांबळे फडणवीसांना भेटले : महेश शिंदे

कामेश कांबळे या सदस्याला कोणीही जबरदस्ती केली नाही, तिथले व्हिडिओ रेकॉर्डिंग तपासून पहा...कामेश कांबळे हा शिवेंद्रराजांचा प्रेमातला कार्यकर्ता आहे, शिवेंद्रराजांनी केवळ त्याच्याशी चर्चा केली...शशिकांत शिंदे यांच्या सदस्यांना कैदी आणतात त्या पद्धतीने धरून आणत होते त्यांना त्यांच्या सदस्यांवर विश्वास नव्हता. मी कोणतीही पक्षविरोधी कारवाई केली नाही. उद्धव ठाकरे यांचं जे सरकार आणि पाडलं त्यासाठीच पडलं होतं की आमचं प्रीपोल अलायन्स भाजपबरोबर होता. याच पद्धतीने कोरेगाव मध्ये सुद्धा आमचा प्रीपोल अलायन्स भाजप बरोबर होता मग आम्ही महाविकास आघाडी बरोबर कसं जाणार, असा सवाल महेश शिंदे यांनी केला.

कामेश कांबळेला आणताना पालकमंत्री सायरन वाजवत घेऊन आले आहेत.कामेश कांबळे हा राष्ट्रवादी काँग्रेसचा सदस्य असून सुद्धा शिवसेनेचे पालकमंत्री सायरन लावून त्यांच्या गाडीतून त्याला घेऊन येत आहेत. त्यामुळे दहशत कोणी केली शांतपणे अभ्यास करा, हाणामारी करण्यासाठी चार हजार लोक बोलवले, असा सवाल महेश शिंदेंनी केला.

राष्ट्रवादीचे सदस्य कामेश कांबळे दोन दिवस आधी देवेंद्र फडणवीस यांना भेटून आम्ही तुमच्या सोबत आहोत. मी शिवेंद्रराजेंचा कार्यकर्ता आहे हे सांगून आले होते.त्यांना कामेश कांबळे म्हणाले होते मला महायुतीमध्ये राहायचं आहे महाविकास आघाडीमध्ये नाही जायचं हे मुख्यमंत्र्यांसमोर मुंबईमध्ये सांगितलं असल्याचा दावा देखील यावेळी आमदार महेश शिंदे यांनी केला. राष्ट्रवादीच्या उमेदवार कामेश कांबळेला किडनॅप त्यांनीच केली डांबून आम्ही कुणाला ठेवलं होतं का? प्रश्न देखील महेश शिंदे यांनी उपस्थित केला. चोराच्या उलट्या बोंबा तुम्हाला तुमच्या सदस्यांवर विश्वास होता तर जिल्ह्यातून चार हजार लोक कशासाठी बोलावले. आमच्या सदस्यांना कोणी धरून आणलं नाही, ना साखळी करून आणलं. दबावाखाली कोणाचे सदस्य होते.. पोलिसांवर हात कोणी उचलले? नाव न घेता मंत्री शंभूराजे देसाई आणि मंत्री मकरंद पाटील यांनी केलं असा आरोप देखील शिंदेंनी केला आहे. ज्या पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल झाला ते पोलीस स्टेशन मंत्री मकरंद पाटील यांच्या मतदारसंघांमध्ये येते.

मी महायुतीचा : महेश शिंदे

शशिकांत शिंदे जिथे जातात तिथे त्यांचा शेवटच होतो. आजपर्यंत तुम्ही बघितला आहे जिथे ते गेले गुलाल उधळला तिथं बुक्का तयार झाला आहे. काल सुद्धा तसंच झालं शशिकांत शिंदे आले नसते तर इतरांचं भलं झालं असतं. महाविकास आघाडी बरोबर जायचं नाही हे सगळ्यांचे ठरलं होतं राष्ट्रवादी बरोबरचे उमेदवार फुटले ते शशिकांत शिंदे यांच्या येण्यामुळे फुटले, असं महेश शिंदे यांनी मोठे विधान केलं होतं.

मला एकनाथ शिंदे यांनी बोलवून माझ्या भूमिकेबद्दल विचारलं होतं. तेव्हा मी त्यांना स्पष्ट केलं होतं की मी भाजपबरोबर लढलो आहे आमची प्रीपोल अलायन्स भाजप बरोबर आहे. दुसऱ्या पक्षाबरोबर आम्ही अलायन्स करण्याचा प्रयत्न केला, परंतु त्यांनी आम्हाला फार किंमत दिली नाही. त्यानंतर मी तीन चार वेळा साहेबांना भेटायचा प्रयत्न केला पण भेट होऊ शकले नाही. या सगळ्या प्रक्रियेमध्ये मिठाचा खडा पालकमंत्र्यांनी का टाकून घेतला हे त्यांचे चुकलं जर मिठाचा खडा म्हणजे शशिकांत शिंदे या प्रक्रियेत आले नसते तर राष्ट्रवादीचे पाच सदस्य आमच्याकडे आले ते आले नसते, असं महेश शिंदे यांनी सांगितलं.

सातारा जिल्हा बँकेची निवडणूक होत आहे.ही निवडणूक वरिष्ठ नेत्यांनी महायुतीच्या माध्यमातून लढवावी असे स्पष्ट केलेलं आहे. मी ही निवडणूक महायुतीच्या माध्यमातून लढणार आहे.ज्याला बरोबर यायचं त्यांनी या नाहीतर नाही माझा प्रीपोल अलायन्स भाजप बरोबर आहे.त्यामुळे आम्ही भाजपबरोबर जाऊनच ही निवडणूक लढणार यात काही शंका नाही, असं महेश शिंदे म्हणाले.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

# भेसळयुक्त खवा व पनीर विकणाऱ्यांवर कठोर कारवाईचे जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांचे आदेश

**बुलढाणा/प्रतिनिधी :** जिल्ह्यातील दूध उत्पादन, दुधाचा वापर आणि दुग्धजन्य पदार्थांच्या निर्मितीतील ताळमेळ तसेच भेसळयुक्त पदार्थांच्या वाढत्या तक्रारींबाबत जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हा दूध भेसळ नियंत्रण समितीची बैठक पार पडली. या बैठकीच्या अध्यक्षस्थानावरून बोलताना जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी भेसळयुक्त पदार्थ विकून ग्राहकांची फसवणूक करणाऱ्या उत्पादक आणि पुरवठादारांविरुद्ध कठोर कारवाई करण्याचे निर्देश अन्न व औषध प्रशासनाला दिले आहेत.

अलीकडच्या काळात बाजारपेठेत पाम तेल, साखर आणि स्किम्ड मिल्क पावडरचा वापर करून तयार केलेला पदार्थ खवा म्हणून, तर पाम तेलापासून बनवलेले चीज ॲनालॉग हे पनीर म्हणून विकले जात असल्याचे समोर आले आहे. हे पदार्थ प्रामुख्याने गुजरात राज्यातून १० किलोच्या बॅगांमध्ये स्पेशल बर्फी किंवा प्लास्टिक डब्यांमध्ये हलवा या नावाने येतात. नियमानुसार, असे पदार्थ विकताना ते पाम तेल व मिल्क सॉलिडपासून बनवलेले आहेत, याची स्पष्ट माहिती ग्राहकांना देणे विक्रेत्यांवर बंधनकारक आहे. मात्र, अनेक विक्रेते छुप्या पद्धतीने याची विक्री करत असून ग्राहकांची दिशाभूल करत असल्याचे जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी नमूद केले.

या पार्श्वभूमीवर, हॉटेल, रेस्टॉरंट आणि मिठाई विक्रेत्यांनी आपल्या मेनू कार्ड किंवा फलकावर अशा पदार्थांची स्पष्ट माहिती द्यावी, असे आवाहन प्रशासनाने केले आहे. जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन करताना सांगितले की, अन्नपदार्थ खरेदी करताना त्यावरील लेबल, घटक आणि प्रकार नीट तपासावेत. कोणत्याही संशयास्पद किंवा भेसळयुक्त पदार्थांबाबत अन्न व औषध प्रशासनाकडे किंवा १८००-२२२-३६५ या टोल फ्री क्रमांकावर त्वरित तक्रार नोंदवावी, असेही त्यांनी स्पष्ट केले आहे.

# नळदुर्ग पोलीसांनी 10 कोटी किंमतीचे हशीम ऑईल केले जप्त

**धाराशिव/प्रतिनिधी :** नळदुर्ग पोलीस ठाणे :दि.१९.०३.२०२६ रोजी सहा पोलीस निरीक्षक- श्री. सोळुंके, पोलीस उप निरीक्षक श्री. गिते हे पोलीस स्टाफ सह उपजिल्हा रुग्णालय नळदुर्ग ते तुळजापूर कडे जाणारे रोडवर नाकांबदी व कोबिंग ऑपरेशन करत असताना पोलीस पथकास एक संशयास्पद कार क्र एमएच १२ जीव्ही १५१७ दिसून आल्याने त्यास थांबण्याचा ईशारा केला असता ती पळून जात असताना पोलीस पथकाने सदर गाडीचा पाठलाग करत होते.

दरम्यान गाडीतील एका इसमानी रोडचे कडेला एक बॅग फेकुन दिल्याने पथकाने सदर बॅगची पाहणी केली असता बॅगमध्ये दहा प्लॅस्टीकच्या पिशव्यामध्ये हिरवट काळपट अवस्थेतील हशीम ऑईल सदृश्य अंमली पदार्थ वजन १०.३८२ कि. ग्रॅ एकुण १०,३८,२०,०००₹ किंमतीचा हशीम ऑईल अमंली पदार्थ माल मिळून आल्याने सदर माल त्याचा सविस्तर पंचनामा करुन माल जप्त करुन ताब्यात घेउन हशीम ऑईल सदृश्य अंमली पदार्थ जवळ बाळगणाऱ्या दोन अनोळखी इसमावर(क्र एमएच १२ जीव्ही १५१७) यांचेविरुध्द गुंगीकारक औषधीद्रव आणि मनोव्यावारावर परिणाम करणारे पदार्थ अधिनियम कलम ८(सी),२०()()(), २५, २९ अन्वये गुरंन ११४/२०२६ असा गुन्हा नळदुर्ग पो.ठा. येथे २०.०३.२०२६ रोजी नोंदवला आहे.

सदरची कामगीरी ही मा. पोलीस अधीक्षक श्रीमती रितु खोखर, अप्पर पोलीस अधीक्षक श्रीमती शफकत आमना यांच्या मार्गदर्शनाखाली मा. उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. निलेश देशमुख, नळदुर्ग पोलीस ठाण्याचे प्रभारी- श्री. परि.सहा.सपोअ मेघना आय एन, सपोनि श्री. सोळुंके, आनंद कांगुने, पोउपनि- श्री. गिते, नळदुर्ग पोलीस ठाण्याचे पोलीस पथकाने केली.

# हिंद-दी -चादर भव्य सांस्कृतिक कार्यक्रमाचे अकोला व नागपूर येथे आयोजन

## नृत्य, नाट्य, गीतांच्या या कार्यक्रमाचा नागरिकांनी लाभ घ्यावा - सांस्कृतिक कार्य संचालक श्रीराम पांडे



दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** श्री गुरु तेग बहादूर साहेब जी यांच्या ३५० व्या शहीदी समागम वर्षानिमित्ताने महाराष्ट्र राज्य सांस्कृतिक कार्य संचालनालयाच्या वतीने सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार यांच्या मार्गदर्शनात हिंद-दी -चादर या नृत्य नाट्य, गीतांच्या भव्य सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन २१मार्च अकोला प्रमिलाताई ओक सभागृह सायं.७ वाजता.व २२मार्च नागपूर सायंटिफिक सभागृह, लक्ष्मीनगर, नागपूर- सकाळी ११ वाजता येथे करण्यात आलेले आहे.

हिंद-दी -चादरश्रीगुरु तेग बहादुर जी यांचे नाव अत्यंत आदराने घेतले जाते. त्यांनी धर्म स्वातंत्र्य मानवता आणि सहिष्णुतेसाठी आपल्या प्राणांचे बलिदान दिले.त्यांचे जीवनकार्य संपूर्ण मानवजातीसाठी प्रेरणादायी आहे. म्हणूनच त्यांना हिंद दी चादर (हिंदुस्थानचे रक्षण करणारी ढाल) असेही संबोधले जाते. म्हणूनच श्रीगुरू तेग बहादूर यांच्या शहिदीच्या ३५०व्या वर्षपूर्तीनिमित्त श्रीगुरू तेग बहादूर यांच्या बलिदानाची आठवण ठेवणे, त्यांच्या विचारांचा प्रसार करणे तसेच समाजात एकता, बंधुता आणि आध्यात्मिक मूल्यांचे संवर्धन करणे असा या कार्यक्रमांचा मुख्य उद्देश. जो विविध धर्म, संप्रदाय व समाजघटकांना एकत्र आणणारा राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश देणारा ठरणार आहे.

राज्यात आठ ठिकाणी आयोजन पंजाबी भक्ती गीत,भांगडा नृत्य आणि नाट्यमय प्रसंग अशा कलाविष्कारांनी युक्त ६० कलावंतांनी साकारलेला हा सांस्कृतिक सोहळा आहे.या हिंद दी चादर सांस्कृतिक कार्यक्रमाचे राज्यात केवळ आठ ठिकाणी आयोजन करण्यात आलेले आहे. वाशी, मिरा रोड, नांदेड, छत्रपती संभाजीनगर येथील प्रयोगांनंतर आता अकोला, नागपूर, नाशिक आणि पिंपरी चिंचवड येथे हा कार्यक्रम संपन्न होत आहे.

या कार्यक्रमात सिने नाट्य क्षेत्रातील मान्यवर कलावंत आहेत. हा सांस्कृतिक कार्यक्रम संपूर्णपणे मोफत असून नागरिकांनी या कार्यक्रमाचा लाभ घ्यावा असे आवाहन राज्य शासन व सांस्कृतिक कार्य विभागाच्या वतीने सांस्कृतिक कार्य विभाग संचालक श्रीराम पांडे यांनी केले आहे.

# भानू अथैय्या : साधनेतून सन्मानाकडे सांस्कृतिक कार्यक्रमाचे २७ मार्च रोजी आयोजन

**मुंबई/प्रतिनिधी :** सांस्कृतिक कार्य विभाग व सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई यांच्या वतीने भारतीय चित्रपटसृष्टीतील 'ऑस्कर' अकॅडमी पुरस्काराने गौरविलेल्या प्रख्यात वेशभूषाकार भानू अथैय्या यांच्या जीवनकार्याला अभिवादन करण्यासाठी 'भानू अथैय्या : साधनेतून सन्मानाकडे' या विशेष सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

हा कार्यक्रम २७ मार्च २०२६ रोजी सायंकाळी ७.०० वाजता रवींद्र नाट्य मंदिर मुंबई येथे होणार आहे. या कार्यक्रमामध्ये गीत, संगीत, नृत्य, दृकश्राव्य सादरीकरण आणि निवेदनाच्या माध्यमातून भानू अथैय्या यांच्या कलाप्रवासाचा व त्यांच्या यशोगाथेचा उलगडा करण्यात येणार आहे.

भानू अथैय्या यांनी आपल्या कारकिर्दीत १०० हून अधिक चित्रपटांसाठी वेशभूषा रचना केली असून, त्यांच्या कामात भारतीय परंपरा, सूक्ष्म अभ्यास आणि ऐतिहासिक अचूकता यांचा उत्कृष्ट संगम दिसून येतो. सन १९८३ मध्ये ''गांधी'' या चित्रपटासाठी त्यांना ऑस्कर पुरस्कार प्राप्त झाला होता. ऑस्कर जिंकणाऱ्या पहिल्या भारतीय होत्या. त्यांच्या कलेमुळे भारतीय चित्रपटसृष्टीला आंतरराष्ट्रीय स्तरावर ओळख मिळाली.

या कार्यक्रमात उर्मिला कानेटकर, वैदेही परशुरामी, मानसी नाईक, भार्गवी चिरमुले, किन्नरी दामा, सुकन्या काळन, अभिनय बेर्डे, नकुल घाणेकर, अभिजित ठाकूर तसेच मंगला खाडिलकर यांसारख्या कलाकारांचा सहभाग असणार आहे. कार्यक्रमाचे नृत्य दिग्दर्शन सुभाष नकाशे व मिनल भिके यांनी केले असून, संहिता लेखन डॉ. सुवर्णा यांनी केले आहे.

# उद्धव ठाकरे सरकारने भोंदूबाबासाठी पायघड्या घालत जीआर काढला त्यावेळी राऊत गप्प का होते

## भाजपा मुख्य प्रवक्ते नवनाथ बन यांचा प्रहार

**मुंबई/प्रतिनिधी :** उद्धव ठाकरे मुख्यमंत्री असताना महाविकास आघाडी सरकारला भोंदूगीरीबद्दल कमालीचे प्रेम होते. याच भोंदूबाबाने तत्कालिन मुख्यमंत्र्यांना वश करून त्यांच्यासाठी विशेष सरकारी अधिसूचना जारी करण्यास भाग पाडले होते. मविआ सरकारने या भोंदूबाबासाठी पायघड्या घातल्या होत्या. याबाबत संजय राऊतांनी आणि उद्धव ठाकरे यांनी उत्तर द्यावे असे आव्हान भारतीय जनता पार्टीचे मुख्य प्रवक्ते नवनाथ बन यांनी शनिवारी दिले. मात्र मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वातील महायुती सरकारच्या कार्यकाळात भोंदूगीरीला, भोंदूबाबांना थारा नाही. खरातचे कारनामे समोर आल्यावर मुख्यमंत्री फडणवीस आणि त्यांच्या सरकारने लागलीच कठोर कारवाई करत भोंदूबाबाला अटक केली, रुपाली चाकणकर यांचा राजीनामा घेतला, असे श्री. बन यांनी नमूद केले.

यावेळी श्री. बन म्हणाले की, सत्तेसाठी, मतांच्या राजकारणासाठी मुस्लीमांच्या अनुनयात रममाण राऊत आणि उबाठा गटाचे हिंदुत्व बेगडी आहे. ज्यांनी खुर्चीसाठी वंदनीय बाळासाहेब ठाकरे यांचे हिंदुत्व सोडले त्या राऊतांना हिंदुत्वाबद्दल लटके प्रेम दाखवण्याचा अधिकार नाही. त्याचवेळी हिंदुत्वाच्या नावावर कोणी बाजार मांडत असेल तर त्याची गय केली जाणार नाही हा स्पष्ट संदेश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या महायुती सरकारने दिला आहे.

भाजपा महायुती सरकार जनतेच्या आशीर्वादाने निवडून दिलेले सरकार आहे. खुर्चीसाठी जनमताचा अनादर करत, पाठीत खंजीर खुपसून विश्वासघात करत आलेले सरकार नाही असा खोचक टोमणा मारत श्री. बन म्हणाले की हे कोणा भोंदूबाबाच्या काळ्या जादूने पडेल इतके तकलादू सरकार नाही.

आधी मिलिंद नार्वेकरांचा राजीनामा घ्या मग .....

भोंदूबाबासोबत महायुती सरकारमधील मंत्र्यांचे फोटो आहेत म्हणून त्यांचे राजीनामे घ्यायला हवेत असे उच्चरवात बोलणा-या राऊतांना आव्हान देत श्री. बन म्हणाले की या न्यायाने तर राऊतांनी आणि उद्धव ठाकरे यांनी हिंमत दाखवून मिलिंद नार्वेकर यांचा आधी राजीनामा घ्यायला हवा आणि मग सत्ताधारी मंत्र्यांबद्दल बोलावे. कारण श्री. नार्वेकर यांचे भोंदूबाबासोबत फोटो समोर आले आहेत. नाशिकचे



संपर्क मंत्री असताना राऊतांसोबत ही भोंदूबाबाचे फोटो समोर येतील तेव्हा राऊत खासदारकीचा राजीनामा देणार का असा खोचक सवाल श्री. बन यांनी केला. कोणा मंत्र्यासोबत या भोंदूबाबाचे फोटो आहेत म्हणून तो मंत्री दोषी असा बादरायण संबंध जोडणे राऊतांनी त्वरित बंद करावे असेही त्यांनी खडसावले.

स्वातंत्र्यवीर सावरकरांचे विचार उद्धव ठाकरे आणि संजय राऊत यांनीच खऱ्या अर्थाने धुळीस मिळवले. स्वा.सावरकरांचा वारंवार अपमान करणा-या राहुल गांधींसोबत खुर्चीसाठी मांडीला मांडी लावून बसणा-या उद्धव ठाकरे, राऊत यांनी त्यांचे सावरकरप्रेम दाखवून दिले आहे अशी टीका श्री. बन यांनी केली. स्वा.सावरकर विज्ञाननिष्ठ होते आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस ही विज्ञाननिष्ठ असल्याने महायुती सरकारकडून भोंदू बाबांवर कारवाई करण्यात आली. संजय राऊत यांना सावरकरांचे नाव घेण्याचा नैतिक अधिकारच उरलेला नाही असेही त्यांनी खडसावले.


# शब्दकोडे क्र. 87

आडवे शब्द

१. अचूक उपाय (ला.) ४. दोघे ७. परीक्षा करण्यात नापास! ११. अपेक्षित वेळेनंतर १२. धार लाव! १३. अटीची भाषा १४. मनात उठणारे वादळ १५. आपल्या डोक्यावरची निळी छत्री १८. खोडसाळ, वात्रट २०. पिकाचा गाळ २२. प्राण्यांसाठी एक ज्ञानेंद्रियच २३. वेगळाच इतिहास रचणाऱ्या बिहारच्या माजी मुख्यमंत्री २४. अस्वल २५. अल्प २७. 'जैसे थे' परिस्थिती २९. मरेपर्यंत ३१अ. दबाव ३२. लहान ३३. संगीतातील एक राग ३५. हार, सर ३६. वस्ती ३८. भांडणाची कळ ३९. कलावंत ४१. देशाचे नाणे ४२. आजूबाजूच्या परिस्थितीप्रमाणे रंग बदलणारा ४३. मार्गक्रमण ४५. त्वरेने, तत्परतेने ४७. नूतन ४८. नाश पावणारे ५०. आवाजाची गोंधळ ५१. विशेष ५३. मोत्याची पैदास करणारा प्राणी ५४. पुन्हा पुन्हा ५७. बाई ५८. मद्य ६०. जुगाराचा एक प्रकार ६१. थेट, सरळ ६३. शुष्कता, तीव्र ऊन ६४. शहाणा, सुंदर ६७. वडील ६९. राख ७२. व्याकूळ, घाबरलेला ७४. पेढ्याचा एक प्रकार ७५. कणीदार ७६. विखारी चेष्टा ७७. शिक्षा

उभे शब्द

१. श्रीमंत बाजीराव पेशवे यांचे घरगुती संबोधन २. शाहिरी मराठीत 'माझ्याबरोबर' ३. नेमका तपशील ४. छाती ५. देवाचे असेल तर ठीक! ६. लकेर ७. समुद्रातील लाटांचा आवाज ८. भरजरी ९. रममाण, निमग्न १०. कबूतर १२. एक पंजाबी नाव १६. ऐन १७. चिडवण्यासाठी केलेले कृत्य १९. सर्वस्व २१. लेखक मतकरींचे नाव २४अ. फळांचे पेय २५. दोस्त २६. शरीर २८. पाताळ २९. शिव्याशाप ३०. अंकित माणूस, गुप्तहेर ३१. शक्ती, जोर, बळ ३१अ. लाही-लाही ३३. हिमालयातील पांडावकालीन सरोवर ३४. वेडावाकडा ३५. खाणाखुणांवरून पाठलाग ३७. उंट हाकणारा ४०. पापडाच्या पिठाची गोळी ४१. हालचाल ४४. पृष्ठभागावरील निघालेला छोटा तुकडा ४५. पटापटा ४६. '--- काय अन् फाटक्यात पाय!' ४९. पाठविलेला ५०. ऋणको, कर्ज घेणारा ५१. फुकटचंबूमुळे पदराला लागणारा लोणच्यातील मसाला ५२. सदोदित ५५. वर्तमानपत्रातील कप्पा ५६. वेतन ५९. न केलेल्या गोष्टींचा पाश्चाताप ६०. महिरप ६२. पशूंचे ओरडणे ६५. विष ६६. सजावट ६७. विहीर ६८. माहूताकडील शस्त्र ७०. मीठ ७१. पलंग, बाज ७३. वाजवण्याची पेटी, फजितीचे वाद्य



## शब्दकोडे क्र. 86 चे उत्तर

आडवे उत्तर

१.कावराबावरा ५.असाधारण ८.पर्ण ९.खट १०.जगन्नाथ १२.डम १३.वर १४.भाषण १५.कोसरा १६.कयास १८.वहिवाट २०.दाखला २२.डास २४.मानिनी २५.रटरट २४.दम ३०.नीट ३२.वर्तमानपत्र ३३.चरवी ३४.मनगट ३६.कारभार ३८.कर्ज ४०.पडाव ४१.रस ४२.खादी ४३.भोजनावळ ४५.डाका ४७.नाट ५०.नकलाकार ५२.जमा ५४.वारकरी ५६.पनीर ५८.जवळजवळ ६०.मस्त ६१.सनई ६३.घर ६४.सामना ६६.पुरता ६७.मरवा ६८.सागर ७०.रम्य ७१.राक्षस ७२.गवगवा ७३.दाम ७४.खास ७५.सोम ७६.लगत ७८.धरणीकंप ८०.साय ८१.अंतर ८२.खानदान ८३.सरडा

उभे उत्तर

१.कारभारीण २.राखणदार ३.बाट ४.राजस ५.अथक ६.धाडस ७.रम ८.परवा ११.गारडा १३.वहिनी १५.कोलार १७.यात्रा १८.वनिता १९.टवटवीत २१.खटपट २३.सदमा २६.टवका २८.मनकवडा २९.पत्रकार ३०.नीर ३१.जनकजननी ३३.चरखा ३५.गर्जना ३७.रसना ३९.मळकट ४०.परका ४४.वन ४६.काजळ ४८.टवाळ ४९.कोरी ५१.रजई ५३.माजघर ५५.कलम ५६.पळपुटा ५७.रमताराम ५९.वर ६१.सर ६२.नवागत ६४.साम्य ६५.नापास ६७.मसलत ६८.सागवान ६९.गवा ७०.रमणी ७३.दार ७४.खापर ७५.सोय ७७.गर ७८.धन ७९.कंस

वृत्तविशेष...

## किनगाव जट्टू येथे श्री स्वामी समर्थ महाराजाचा प्रगट दिन साजरा





दैनिक आपला विदर्भ

■ केशव सातपुते

**किनगाव जट्टू** : श्री स्वामी समर्थ अध्यात्मिक व बालविकास केंद्रात दिनांक २० मार्च रोजी ब्रम्हांडनायक श्री स्वामी समर्थ महाराजांचा प्रगट दिन भक्ती भाव आणि श्रद्धेने उत्साहात साजरा करण्यात आला यावेळी गावातून श्रीच्या पालखीची मिरवणूक काढण्यात आली प्रकट दिनानिमित्त शुक्रवारी केंद्रात सकाळी६.३० ला भूपाळी आरती१०. ३० ला. नैवेद्य आरती झाल्यानंतर स्वामी चरित्र सारामृत पारायण श्री स्वामी समर्थ नाम जप नित्य उपासना अश्या विविध धार्मिक कार्यक्रमानंतर सायंकाळी ५ च्या दरम्यान सेवेकरांच्या वतीने श्रीच्या पालखीची टाळ पखवाजाच्या निनादात व स्वामीच्या गजरात मिरवणूक काढण्यात आली. यावेळी महिलांनी रस्त्यावर आपापल्या घरासमोर रांगोळी काढून पालखीचे स्वागत केले सायंकाळी ६. ३० ला नैवेद्य आरती झाल्यानंतर सर्व भाविकांना प्रसाद वितरित करण्यात आला यावेळी महिला सेवेकरी सौ राणीताई महाजन सौ शितलताई मुंडे सौ विमलताई काकड सौ. जयश्रीताई जायभाये सौ संगीताताई रांधवन यांनी अथक परिश्रम घेतले ..

## शासकीय सुट्ट्यांमध्येही दुय्यम निबंधक कार्यालये सुरु राहणार

**बुलढाणा/प्रतिनिधी :**आर्थिक वर्ष संपत आले असून, नवीन वर्षाच्या निमित्ताने मालमत्ता खरेदी-विक्रीच्या व्यवहारांमध्ये होणारी वाढ लक्षात घेता मार्च महिन्यातील सार्वजनिक सुट्यांच्या दिवशीही राज्यातील दुय्यम निबंधक आणि सह जिल्हा निबंधक कार्यालये सुरू ठेवण्याचे आदेश देण्यात आले आहेत. मालमत्ता खरेदीदारांनी सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी दस्त नोंदणी करण्याचे आवाहन, जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी केले आहे.

मार्च महिन्यातील २६, २८, २९ आणि ३१ मार्च २०२६ या चार सार्वजनिक सुट्यांच्या दिवशी सर्व दुय्यम निबंधक कार्यालये नियमितपणे सुरू राहतील. यामध्ये शनिवार आणि रविवारच्या सुट्यांचाही समावेश आहे. ज्या कार्यालयांची साप्ताहिक सुटी शनिवार-रविवार सोडून इतर दिवशी असते, अशा कार्यालयांनी त्यांच्या दोन सुट्यांपैकी एक दिवस कार्यालय सुरू ठेवून कामकाज पूर्ण करावे, अशा सूचना देण्यात आल्या आहेत.

मार्च महिना हा आर्थिक वर्षाचा शेवटचा महिना असल्याने शासकीय महसूल उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी तसेच नवीन वर्षानिमित्त अनेक नागरिक नवीन घराची किंवा जमिनीची खरेदी करतात. या काळात दस्तनोंदणीचे प्रमाण मोठ्या प्रमाणावर वाढते. मुद्रांक शुल्काची प्रलंबित प्रकरणे निकाली काढणे आणि नागरिकांची गैरसोय टाळण्यासाठी निबंधक कार्यालय सुरू राहील.

मुंबई शहर आणि उपनगरासह राज्यातील सर्व जिल्ह्यांमधील नोंदणी कार्यालये पूर्ण क्षमतेने कार्यरत राहणार आहेत. यामुळे मालमत्ता खरेदीदारांना सुटीच्या दिवशीही आपले दस्त नोंदणीकृत करून घेता येतील.

## नुकसानीचे तात्काळ पंचनामे करा- केंद्रीय राज्यमंत्री जाधव यांचे निर्देश

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** जिल्ह्यात दि. १८ व १९ मार्च रोजी झालेल्या अवकाळी पाऊस आणि गारपिटीमुळे झालेल्या नुकसानीचे तात्काळ पंचनामे करण्याचे निर्देश केंद्रीय आरोग्य व कुटुंब राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी जिल्हा प्रशासनाला दिले. बुलढाणा जिल्ह्यातील अनेक भागांमध्ये वादळी वाऱ्यासह गारांचा पाऊस पडला. त्यामुळे गहू, कांदा, मका, ज्वारी, मोसंबी, केळी व डाळिंब पिकांचे नुकसान झाले. यामध्ये जळगाव जामोद तालुक्यात ४१ गावे बाधित झाली असून ९५० हेक्टर क्षेत्रातील पिकांचे नुकसान झाले. मलकापूर तालुक्यातील ४२ गावे बाधित झाले असून ७५० हेक्टर क्षेत्रातील पिकांचे नुकसान झाले. खामगाव तालुक्यातील २० गाव बांधीत होऊण १४८ हेक्टर क्षेत्रातील पिकांचे नुकसान झाले. चिखली तालुक्यातील १८ गावे बधीत होऊन ७१२ हेक्टर वरील पिकांचा नुकसान झाले.

मोताळा तालुक्यातील १६ गावातील १०२ हेक्टर, नांदुरा तालुक्यातील १५ गावतील २१० हेक्टर, बुलडाणा तालुक्यातील १४ गावातील १४५ हेक्टर, देऊळगाव तालुक्यातील १२ गावातील ५५० हेक्टर, संग्रामपूर तालुक्यातील ११ गावातील ७० हेक्टर, लोणार तालुक्यातील १० गावतील १९० हेक्टर असे ३८०२ क्षेत्र अवकाळी पाऊस आणि गारपीटीमुळे बाधित झाले आहे. या सर्व बाधीत क्षेत्राचे पंचनामे तात्काळ करण्याचे निर्देश केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी जिल्हा प्रशासन आणि कृषी विभागला दिले आहे.

# मेहकरमध्ये रमजान ईद उत्साहात; नगराध्यक्ष किशोर गारोळे यांची ईदगाहसह विविध ठिकाणी उपस्थिती

दैनिक आपला विदर्भ







**मेहकर/प्रतिनिधी :** पवित्र रमजान ईदच्या निमित्ताने मेहकर येथील ईदगाह मैदानावर मोठ्या उत्साहात नमाज अदा करण्यात आली. सकाळपासूनच मुस्लिम बांधव मोठ्या संख्येने येथे उपस्थित राहून एकमेकांना ''ईद मुबारक''च्या शुभेच्छा देत सणाचा आनंद साजरा करत होते.

यावेळी मेहकर नगरपरिषदेचे नगराध्यक्ष किशोर गारोळे यांनी ईदगाह येथे उपस्थित राहून मुस्लिम बांधवांच्या भेटीगाठी घेत सर्वांना रमजान ईदच्या मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या. ईदपूर्वी नगराध्यक्षांनी ईदगाह परिसराची पाहणी करून त्या पवित्र स्थळाची रंगरंगोटी स्वखर्चातून करून दिली. तसेच कोणत्याही सुविधा अपुऱ्या पडू नयेत यासाठी त्यांनी विशेष लक्ष देत आवश्यक त्या सोयीसुविधांची पूर्तता केली. ईदच्या दिवशीही त्यांनी स्वतः उपस्थित राहून मुस्लिम बांधवांशी संवाद साधत त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या. त्यांच्या या उपक्रमामुळे उपस्थितांमध्ये आपुलकीची भावना निर्माण झाली.

तसेच ईद निमित्त मेहकर शहरातील विविध ठिकाणी आयोजित कार्यक्रमांमध्येही नगराध्यक्ष किशोर गारोळे यांनी आवर्जून उपस्थिती दर्शवून मुस्लिम बांधवांना शुभेच्छा दिल्या.

यावेळी त्यांनी एकात्मता, बंधुता आणि सामाजिक सलोखा यांचा संदेश देत सर्व समाजघटकांनी परस्पर सौहार्द जपण्याचे आवाहन केले. शहराच्या विकासासाठी नगरपरिषद सातत्याने कार्यरत असून, कोणताही भेदभाव न करता सर्व नागरिकांना सुविधा देण्यास आपण कटिबद्ध असल्याचे त्यांनी सांगितले. या प्रसंगी नगरसेवक सतीश ताजने, नितीन तुपे, महेश रिंढे, पत्रकार सिद्धेश्वर पवार, अँड.संदीप गवई, वैभव उमाळकर यांच्यासह इतर मान्यवर व नागरिक उपस्थित होते.

## मुसळधार पाऊस व गारपीटीमुळे शेतकऱ्यांचे लाखोंचे नुकसान



दैनिक आपला विदर्भ

■ देवानंद सानप

**लोणार** : दि. १९ मार्च रोजी सायंकाळी सुमारे ६ वाजताच्या सुमारास झालेल्या मुसळधार पावसासह गारपीटीमुळे लोणार तालुक्यातील वझरआघाव, येवती, कासारी व भुमराळा शिवारातील शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.

अवकाळी पावसाच्या या तडाख्यामुळे शेतकऱ्यांच्या हातात आलेली पिके अक्षरशः उद्ध्वस्त झाली असून लाखो रुपयांचे आर्थिक नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात येत आहे.

या नैसर्गिक आपत्तीमुळे शेतात उभे असलेले कांदा, गहू, ज्वारी यांसह विविध फळपीक व फळभाज्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. अचानक आलेल्या या संकटामुळे शेतकरी हवालदिल झाले असून त्यांच्या पुढे मोठे आर्थिक संकट उभे ठाकले आहे.

दरम्यान, या पार्श्वभूमीवर काही राजकीय नेत्यांनी नुकसानग्रस्त भागाची पाहणी करत शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन परिस्थितीचा आढावा घेतला. त्यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधत त्यांना धीर दिला तसेच शासनाकडून मदत मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे सांगितले. यावेळी स्थानिक पदाधिकारी व शेतकरी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## सारेगमप लिटिल चॅम्प फेम शरयू दातेचं लग्न ठरलं, केनियात केलं प्रपोज

'सारेगमप लिटिल चॅम्प्स' मधील लोकप्रिय गायिका शरयू दाते हिच्या घरात लवकरच सनई-चौघडे वाजणार आहेत. शरयूने तिचा दीर्घकाळाचा मित्र आणि बॉयफ्रेंडसोबतच्या नात्याची अधिकृत घोषणा केली आहे. विशालने परदेशात एका निसर्गरम्य ठिकाणी गुडघ्यावर बसून शरयूला लग्नासाठी विचारले. या 'सरप्राईज' प्रपोजलने शरयू भारावून गेली असून तिने हा आनंदाचा क्षण चाहत्यांसोबत शेअर केला आहे.

आपल्या मधुर आवाजाने वेड लावणारी 'सारेगमप लिटिल चॅम्प' फेम गायिका शरयू दाते लवकरच विवाहबंधनात अडकणार आहे. शरयूने सोशल मीडियाच्या माध्यमातून आपल्या आयुष्यातील या सर्वात मोठ्या बातमीचा खुलासा केला असून, तिचे 'प्रपोजल' सध्या चर्चेचा विषय ठरले आहे.

## मिशन लक्ष्यवेध योजनेअंतर्गत खेळाडू निवड चाचणी ५ एप्रिलला

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** क्रीडा व युवक सेवा संचालनालय, पुणे यांच्या वतीने राबविण्यात येत असलेल्या मिशन लक्ष्यवेध योजना अंतर्गत जिल्हास्तर क्रीडा निपुणता केंद्रासाठी खेळाडू निवड चाचणीचे आयोजन करण्यात आले आहे. ही चाचणी दि. ५ एप्रिल २०२६ रोजी जिल्हा क्रीडा संकुल, जांभरून रोड, बुलढाणा येथे होणार आहे.

या योजनेअंतर्गत बुलढाणा येथे वेटलिफ्टिंग व मैदानी (ॲथलेटिक्स) या क्रीडा प्रकारांसाठी निवासी स्वरूपाचे क्रीडा निपुणता केंद्र स्थापन करण्यात येणार आहे. निवड झालेल्या खेळाडूंना दर्जेदार प्रशिक्षण, क्रीडा साहित्य, अल्पोहार तसेच क्रीडा विज्ञान विषयक सहाय्य शासन मान्यतेनुसार उपलब्ध करून दिले जाणार आहे. जिल्ह्यातील पात्र व गुणवंत खेळाडूंना प्रगत प्रशिक्षण देण्याच्या उद्देशाने ही निवड प्रक्रिया राबविण्यात येत आहे. इच्छुक खेळाडूंनी दि. १ एप्रिल २०२६ सायंकाळी ६ वाजेपर्यंत निर्धारित नमुन्यातील अर्ज आवश्यक कागदपत्रांसह सादर करावा.

निवड निकष : खेडाळू हा ३१ डिसेंबरपर्यंत २१ वर्षांखालील मुलगे/मुली, महाराष्ट्र राज्यातील खेळाडू असणे आवश्यक, राज्यस्तरीय पदक विजेते किंवा राष्ट्रीय स्तरावर सहभागी (डत्रव्रख, थत्रख, घहशश्रे खपवळर) खेळाडू गत २ वर्षाच्या क्रीडा कामगिरीचे मुल्यमापन करण्यात येऊन क्रीडा कौशल्य व तंदुरुस्ती चाचण्यांमध्ये पात्र होणे आवश्यक व शासन मान्यताप्राप्त डॉक्टरांचे फिटनेस प्रमाणपत्र अनिवार्य राहिल.

आवश्यक कागदपत्रे: जन्म दाखला, शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र, अधिवास प्रमाणपत्र, आधार कार्ड, क्रीडा कामगिरी प्रमाणपत्र, ३ फोटो, बोनाफाईड प्रमाणपत्र, पालक संमतीपत्र इत्यादी.

अर्जाचा नमुना व आवश्यक कागदपत्रांचा तपशील https://forms.gle/LrdFvr69gSqjQQR9 या लिंक मध्ये उपलब्ध असून इच्छुक विद्यार्थ्यांनी आवश्यक कागदपत्रासह अर्ज जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, जिल्हा क्रीडा संकुल, जांभरून रोड, बुलढाणा ४४३००१ येथे सादर करावा. तसेच अपूर्ण अर्ज स्वीकारले जाणार नाहीत. निवड प्रक्रिया शासनाने निश्र्चित केलेल्या निकषांनुसार तज्ज्ञ समितीद्वारे करण्यात येणार आहे, अशी माहिती प्रसिद्धी पत्रकाव्दारे जिल्हा क्रीडा अधिकारी बि.एस. महानकर यांनी दिली.

## टीसीएसच्या परीक्षेला विद्यार्थ्यांची गर्दी

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी :** अभियांत्रिकी व तत्सम उच्च शिक्षणातील पदवी घेतलेल्या विद्यार्थ्यांनी शनिवारी (२१ मार्च) टीसीएसची परीक्षा दिली. ही परीक्षा शनिवारी दोन सत्रांमध्ये घेण्यात आली. उद्या म्हणजे रविवारीही एका सत्रात ही परीक्षा होणार असल्याची माहिती येथील केंद्रावरून मिळाली. शनिवारी सकाळी ९ ते १२ च्या वेळेतील पहिल्या सत्रात साधारण ३०० विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. तर दुपारी २ ते ५ या वेळेतील दुसऱ्या सत्रातही ३०० च्या आसपास विद्यार्थी परीक्षेला उपस्थित होते, अशी माहिती देण्यात आली. छत्रपती संभाजीनगरमधील वाळूज भागातील आयसीईएम या परिसरातील केंद्रामध्ये टीसीएसची दोन्ही सत्रातील परीक्षा पार पडल्या. या परीक्षेला छत्रपती संभाजीनगर महानगर व परिसरातील पैठण, सिल्लोड, वैजापूर व शहरात वास्तव्यास असलेल्या विद्यार्थ्यांनी हजेरी लावली होती. यामध्ये मुलींची संख्या लक्षणीय होती. परीक्षार्थी विद्यार्थिनी पालकांसह सकाळी सव्वा आठच्या सुमारासच परीक्षा केंद्रावर दाखल झालेल्या होत्या. अनेक मुस्लिम समाजातील विद्यार्थ्यांनीही परीक्षेला हजेरी लावली होती. सकाळची प्रार्थना करून दूरच्या अंतरावरील अनेक विद्यार्थी परीक्षेसाठी आले होते. यामध्ये अनेक मुलीही होत्या. कोडिंग अभ्यासाशी संबंधित प्रश्न विचारण्यात आले होते, अशी माहितीही काही परीक्षार्थी विद्यार्थ्यांनी दिली.

# अवकाळीने रब्बी मातीमोल! बुलढाण्यातील २०१ गावांना फटका; तीन हजार ८०२ हेक्टरवरील पिकांची मोठी हानी

दैनिक आपला विदर्भ


**बुलढाणा-अमरावती/प्रतिनिधी :** विदर्भातील अमरावती आणि बुलढाणा जिल्ह्यात दोन दिवस अवकाळी पावसासह झालेल्या गारपिटीने शेतकऱ्यांचे रब्बी हंगामातील उत्पन्नाचे स्वप्न मातीमोल झाले आहे.

एकट्या बुलढाणा जिल्ह्यातील २०१ गावांतील ३ हजार ८०२ हेक्टरवरील पिके या पावसाने उद्ध्वस्त झाली आहेत. तसा प्राथमिक अंदाजाचा अहवाल कृषी विभागाने जिल्हाधिकाऱ्यांना सादर केला आहे.

गहू, हभरा, कांदा, कांदा बीज, मका, ज्वारी, भाजीपाला, डाळिंब, केळी, पपई, संत्रा, मोसंबी, आंबा, बाजरी पिके आडवी झाली. तालुकानिहाय विचार करता



चिखलीतील १८ गावे, बुलढाणा १४, मोताळा १६, मलकापूर ४२, खामगाव २०, शेगाव दोन, नांदुरा १५, जळगाव-जामोद ४१, संग्रामपूर ११, लोणार १०, देऊळगाव राजा तालुक्यातील १२ गावांमध्ये नुकसानीची तीव्रता अधिक आहे.



विनोद नामदेव करे
गट. नं १३२ मोहना बु.

दरम्यान, मोताळा तालुक्यातील तळणी येथे वीज कोसळून एका शेतकऱ्याचा तीन एकरातील हरभरा जळून खाक झाला. गुरुवारी रात्री ही घटना घडली. तळणी येथील श्रीनिवास पद्माकर नाफडे यांनी हरभरा पेरला होता. तीन एकरातील हरभरा सोंगून त्याची गंजी घालण्यात आली होती. रात्रीच्या सुमारास वादळी पावसात वीज कोसळल्याने हरभऱ्याची गंजी जळाली. यात सुमारे दोन लाखांवर नुकसान झाले आहे.

अमरावती जिल्ह्यात सलग दुसऱ्या दिवशी मेळघाटसह अंजनगाव सुर्जी आणि अचलपूर तालुक्यात वादळी वाऱ्यासह पाऊस झाला. अमरावती शहर, नांदगाव खंडेश्वर आणि भातकुली तालुक्यातही मध्यरात्रीपासून पावसाची रिपरिप सुरू होती. मेळघाटातील काटकुंभ, कोयलारी, बामादेही, राजनिकुंड आणि चुरणी परिसरात गुरुवारी मध्यरात्री १ वाजताच्या सुमारास वादळी पाऊस झाला. या पावसासोबत झालेल्या गारपिटीने उभ्या गव्हाच्या पिकाचा अक्षरशः चिखल केला. यंदा पीक चांगले येईल, या आशेवर असलेल्या शेतकऱ्यांच्या तोंडचा घास या पावसाने हिरावला आहे. यानिमित्ताने मेळघाटातील आदिवासी शेतकरी आता आर्थिक संकटात सापडला आहे.

प्रशासनाने या नुकसानीचे तात्काळ पंचनामे करून नुकसान भरपाई जाहीर करावी, अशी मागणी जोर धरत आहे.

**पांढरा कांदा संकटात**

अंजनगाव सुर्जी तालुक्यातील वनोजा भागात १९ मार्च रोजी दुपारी गारपिटीने तडाखा दिला. तालुक्याचा पांढरा कांदा देशभरात प्रसिद्ध आहे, मात्र काढणीला आलेला हा कांदा आता पावसात भिजल्याने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. त्यातच व्यापाऱ्यांनी पावसाचे निमित्त साधून दरात मोठी कपात केली आहे. दीड हजार रुपये क्विंटल असलेला कांदा आता साडेआठशे रुपयांवर आला आहे.